सत्र खटला क्र.४२/२०२२
शासन वि. असद
निशाणी ३०

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी**

मी शपथेवर सांगतो की, माझे
नाव – गजानन शिवदास खंदाडे,
वय – ४२ वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. साताळा, ता. अहमदपूर, जि.लातूर

**सरतपास सरकार तर्फे श्री.एम.के. पाटील, सहाय्यक सरकारी वकील**

दि.३०.०८.२०२१ रोजी मी साताळा येथील बसस्थानकाजवळीलस असलेल्या मंदीराजवळ बसलो होतो. त्या दिवशी साताळा ते धानोरा जाणाऱ्या रस्त्यावर एका कारचा अपघात झालेला होता. अपघाताबाबत मी फक्त ऐकले होते. पोलीसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा तयार केला नव्हता. तो आता मला दाखविला असता त्यावरील माझी सही मी ओळखतो. मला त्यातील मजकुर माहीती नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील माझी सही निशाणी ३१ वर आहे.

०२. असे घडले नव्हते की, दि.३०.०८.२०२१ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळावर घटनास्थळ पंचनामा तयार करण्यासाठी बोलाविले होते.

**सरकारी वकीलांनी विनंती केली की, साक्षीदार यास सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी**

**द्यावी, सर्व तथ्यांचा विचार करता सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली.**

**<u>उलटतपास सरकार पक्षातर्फे श्री.एम.के. पाटील, सहाय्यक सरकारी वकील</u>**

०३. हे म्हणणे खरे नाही की, दि.३०.०८.२०२१ रोजी पोलीस हवालदार डोईजड यांनी मला सताळा ते धानोरा जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या पुलावर झालेल्या अपघाताबाबत घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सोबत दुसरा पंच म्हणुन बालाजी चव्हाण हा सुध्दा उपस्थीत होता. हे म्हणणे खरे नाही की, गौस तांबोळी या व्यक्तीने आम्हाला घटनास्थळ दाखविले होते व त्याप्रमाणे घटनास्थळाचा पंचनामा पोलीस हवालदार डोईजड यांनी तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा तयार केल्यानंतर पोलीस हवालदार डोईजड यांनी तो मला वाचण्याकरीता दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर बरोबर असल्यामुळे मी त्यावर माझी सही केली.

०४. माझे शिक्षण इयत्ता दहावी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहीता व वाचता येते. मी कोणत्याही कागदपत्रांवर त्यातील मजकुर वाचल्याशिवाय सही करीत नसतो. प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा तयार केल्यानंतर तो मला वाचण्याकरीता दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस हवालदार डोईजड यांच्या सांगण्यावरून पंचनाम्यावर माझी फक्त सही केली होती. मी गौस तांबोळी नावाच्या व्यक्तीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी असद तांबोळी यास प्रकरणात शिक्षा होऊ नये म्हणून मी आज न्यायालयात त्याला वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपीतर्फे श्री.एन.एन.देमगुंडे, विधिज्ञ

यांनी नाकारला.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

नि. श्र. स्वीकृत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAVIN KISHANRAO NARDELE
Date: 2026.07.24 14:56:19 +0530

(प्र.कि.नरडेले)

दिनांक – २४.०७.२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश अहमदपूर.